संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# इसिसचे केरळी कारस्थान

लोकसभा निवडणुकीच्या काळातच दहशतवादी गोंधळ घालतील. किंवा निवडणूक प्रक्रियेमध्ये अडचणी निर्माण करून अस्थिरता माजवतील अशी शंका वाटत होती. परंतु सुरक्षा यंत्रणांनी चांगलीच खबरदारी घेतली. आणि निवडणुका एकाअर्थी पार पडल्या. अगदी जम्मू काश्मिरमध्येसुध्दा काही तुरळक गोष्टी सोडल्या तर मतदान प्रक्रिया शांततेत पार पडल्याचे म्हणावे लागेल. याचा अर्थ दहशतवादाचे आव्हान कमी झाले आहे असे समजण्याचे कारण नाही. कारण निवडणुका संपल्याबरोबरच इसिस या दहशतवादी संघटनेने फतवा जारी करून भारतातल्या केरळ राज्यावर लक्ष केंद्रीत  करणार असल्याचे जाहीर केले. इसिसच्या या इशाऱ्याकडे भारतीय गुप्तचर यंत्रणांनी अतिशय गांभीर्याने लक्ष दिले आहे. केरळ राज्य सरकारनेसुध्दा राज्यातील गुप्तचर यंत्रणा अधिक वेगाने कार्यरत केली आहे. कारण केरळच्या विशिष्ट जिल्ह्यांमध्ये तरुणांना आपल्याकडे आकर्षित करण्याचा प्रयोग इसिसने केला होता. काही तरूण आपले घरदार सोडून इसिसमध्ये दाखलही झाले होते. याशिवाय काही मुस्लिम राष्ट्रांमध्ये नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने जाणाऱ्या केरळी लोकांवर इसिसने लक्ष केंद्रित केल्याची माहिती पुढे आली आहे. इसिसने केरळचीच निवड का करावी. याचादेखील गांभीर्याने शोध घेतला पाहिजे मात्र ज्या अर्थी केरळची निवड केली जाते. त्याअर्थी इसिसला आवश्यक ते सगळे अनुकूल वातावरण तिथे उपलब्ध आहे याचे ते निदर्शक ठरते. आता या इशाऱ्याचा पाठपुरावा भारतीय गुप्तचर यंत्रणा कसा करतात आणि इसिसच्या कटकारस्थानाला कसे उधळून लावतात यावर बरेच काही अवलंबून राहील. थोडा अधिक गांभीर्याने विचार केला तर इसिसचे हे व्यापक कारस्थान दिसते. काश्मीर, केरळ, गुजरातेतील कच्छ किंवा बंगालमधील कोलकाता अशी देशाची चार ठिकाणे निश्चित करून आपले जाळे भक्कम करण्याचा इसिसचा डाव असू शकतो. काश्मिरमध्ये यापूर्वीच स्थानिक रहिवाशांना हाताशी धरून अस्थिरता माजवण्याचा प्रयत्न इसिसने सुरु केलेला आहे. सुदैवाने पुलवामा हल्ल्यानंतर काश्मिरमध्ये लष्कराला पूर्ण मोकळीक दिल्याने तिथला दहशतवाद काही प्रमाणात नियंत्रणात आला परंतु ही परिस्थिती कायमस्वरुपी राहू शकत नाही.

### व्यापक कटाचा भाग

केरळ हे देशाच्या दक्षिण टोकाचे राज्य म्हणता येते. मोठा समुद्र किनारा लाभलेल्या या राज्यात मुस्लिमांची लोकसंख्या ही दखल घेण्याइतकी आहे. आपल्या कारवाया पसरवण्याकरीता केरळची भौगोलिक परिस्थिती कारणीभूत ठरू शकते. प्रामुख्याने आपल्या कार्याला किंवा ध्येयाला सक्रिय पाठिंबा देणारे लोक केरळमध्ये अधिक प्रमाणात लाभू शकतात हादेखील इसिसचा अंदाज असू शकेल. कारण स्थानिकांच्या मदतीने दहशतवाद पसरवणे खूप सोपे जात असते. किंबहुना त्याची परिणामकारकता तुलनेने लवकर साधता येते. काश्मिरमध्ये हीच कार्यपध्दती यशस्वी झाली. स्थानिकांना हाताशी धरून दहशतीचे तंत्र यशस्वी केले गेले. गेली तीस चाळीस वर्षे काश्मीर खोरे अशांत ठेवले गेले. त्या काळात इसिससारख्या संघटना नव्हत्या. परंतु लष्कर ए तोयबा, हिजबुल मुजाहिद्दीन या संघटनांनी काश्मिरमध्ये अक्षरशः घुसखोरी केली. तिथल्या बेरोजगार तरूणांना हाताशी धरून त्याची माथी भडकवण्याचे काम केले. त्यातून इतके भयानक परिणाम पुढे आले की त्या तरूणांच्या मनात सुरक्षा यंत्रणांच्या विरुध्द प्रचंड द्वेष निर्माण केला गेला. याला काश्मिरमधले स्थानिक राजकारणीसुध्दा तितकेच जबाबदार आहेत. कारण त्यांची राजकीय पोळी भाजण्याकरीता तो परिसर अस्थिर असणे त्यांना गरजेचे असते. इतर दहशतवादी संघटनांच्या मदतीने आणि पाकिस्तानच्या पुढाकाराने हा खेळ चालू राहिला. आणि शेकडो सामान्य माणसांबरोबरच जवानांचे बळीही गेले. आंतरराष्ट्रीय स्तरावर दहा वर्षापूर्वी इसिस या आंतरराष्ट्रीय संघटनेचा जन्म झाला. त्या संघटनेने अतिशय वेगाने आपले पाय पसरवले.अनेक पाश्चिमात्य देशात दहशत पसरवण्याचे किंबहुना पाश्चिमात्य लोकांचे प्राण घेण्याचा क्रूरपणा इसिसच्या दहशतवाद्यांनी केला आहे. भारताने जगातल्या दहशतवादविरोधी लढ्यात पुढाकार घेतला अमेरिकेच्या दहशतवादविरोधी मोहीमेत भारताने पूर्ण पाठिंबा दिला. त्यावेळीसुध्दा इसिसने जाहीरपणे भारताला इशारा दिला होता. आज भारताच्या काही प्रांतांमध्ये इसिसचे जाळे पसरू लागलेले स्पष्टपणे दिसून येते. काश्मिरमध्ये काही प्रमाणात इसिसच्या हालचाली दिसून येतात.

### दक्षिणेतील राज्यांना धोका

आता केरळसारख्या राज्यावर लक्ष केंद्रित करण्याचा इसिसचा डाव अत्यंत धोकादायक म्हणावा लागेल. म्हणूनच केंद्र सरकारने याची अधिक गांभिर्याने दखल घ्यायला हवी. कोणत्याही परिस्थितीत इसिसला केरळच काय परंतु भारताच्या कोणत्याही भागातून स्थान मिळणार नाही. असे बघितले गेले पाहिजे. त्यातही ज्यावेळी केरळसारख्या प्रांताची निवड केली जाते. त्याअर्थी दोन महत्त्वाच्या शक्यता स्पष्टपणे दिसून येतात. भारतातल्या एका विशिष्ट वर्गाची सहानुभूती मिळवणे आणि त्यांची माथी भडकवून दहशतीचा अजेंडा जोरदारपणे राबवणे आतापर्यंतच्या दहशतवादी संघटनांनी जो मार्ग अवलंबला त्यापेक्षाही अधिक आक्रमक आणि क्रूर पध्दत इसिसने अवलंबली आहे. शस्त्रास्त्रेसुध्दा आधुनिक पध्दतीची आहेतच परंतु या माहिती तंत्रज्ञानाचा तितकाच मोठ्या प्रमाणावर वापर करून सायबर विश्वातही दहशत निर्माण करण्यात इसिस यशस्वी झालेली दिसून येते. माहिती हॅक करण्यापासून ते तरूणांना आपल्या विचाराकडे खेचण्यासाठी या तंत्रज्ञानाचा वापर करणारी ही आघाडीची दहशतवादी संघटना आहे असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही. या सगळ्या पार्श्वभूमीवर केरळ सरकार विशिष्ट राज्याबाबत ही संघटना विशेष आग्रही राहाणार असेल तर तो संपूर्ण भारतासाठीच धोका ठरतो. दक्षिणेतील राज्यांमध्ये  त्याचा उपद्रव होऊ शकतो. श्रीलंकेत झालेला भीषण बॉंबस्फोट हा इसिसच्याच कारवाईचा भाग होता. या काही घटनांचा संदर्भ लावला तर दक्षिण भारतातील राज्ये टार्गेट करून हा नवा टिपू सुलतानी धोका येऊ घातला आहे. असे म्हणायला हरकत नाही.